मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कुदळवाडी, चिखली रस्त्यामधील अतिक्रमणे हटवली

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विशेष मोहिम




**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विशेष मोहिमे अंतर्गत, प्रभाग क्र.०२ मधील कुदळवाडी, चिखली ३० मीटर डी.पी.रस्त्यामधील सुमारे १,६२,००० चौ.फुट क्षेत्रातील १५ वीट बांधकाम व पत्राशेड इत्यादीवर अतिक्रमण निष्कासनाची आज कारवाई करण्यात आली व रस्ता रुंदीकरण करण्यात आले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे – पाटील, शहर अभियंता मकरंद निकम व मनोज लोणकर उपआयुक्त यांचे निर्देशानुसार कारवाई करणेत आली. क, ई,फ व ह क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, सिताराम बहुरे व उमेश ढाकणे तसेच कार्यकारी अभियंता राजेंद्र राणे, उपअभियंता सुर्यकांत मोहिते, मनोज बोरसे,नरेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली कनिष्ठ अभियंता संदिप वैद्य, किरण सगर, इम्रान कलाल, क्षितीजा देशमुख,चंद्रकांत पाटील, प्रियंका म्हस्के, रचना दळवी व संदिप वाडीले तसेच स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक श्वर्या मासाळ,केशव खांडेकर, निकिता फ़डतरे, श्रीकांत फ़ाळके, स्मिता गव्हाणे व मनपा कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बल, महाराष्ट्र पोलिस, यांच्या नियंत्रणाखाली सदर कारवाई करण्यात आली.

प्रभाग क्र.०२ चिखली/ कुदळवाडी परिसरातील सुमारे १,६२,००० चौ.फुट वीट बांधकाम व पत्राशेडवर अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात आली. दि.२८/०२/२०२४ रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत क, ई, फक्षेत्रीय कार्यालयाकडील अतिक्रमण पथक, महाराष्ट्र सुरक्षा बल व महाराष्ट्र पोलीस पथक, सहभागी झाले होते.दररोज शहराच्या विविध भागात अतिक्रमण कारवाई केली जात आहे. नागरिकांनी रस्त्यांवर बेवारस वाहने उभी करुन नये, तसेच अनधिकृत टप-या व पत्राशेड व बॅनर्स उभारु नये. तसेच फुटपाथ स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे, महानगरपालिका आयुक्त यांच्या निर्देशनानुसार सदर कारवाई केलेल्या ठिकाणी मनपा परवानगी घेतल्याशिवाय अनधिकृत पत्राशेड, बांधकाम करु नये, अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

# निगडीत रानजाई महोत्सव, फळे-फुले भाजीपाला बागा प्रदर्शन

## 'रानजाई महोत्सव' व २७ वे भव्य 'फळ-फुले भाजीपाला बागा प्रदर्शन

**। पिंपरी-चिंचवड।**
पिंपरी-चिंचवड महापालिका वृक्ष प्राधिकरण यांच्या वतीने 'रानजाई महोत्सव' व २७ वे भव्य 'फळ-फुले भाजीपाला बागा प्रदर्शन व स्पर्धा ' १ ते ३ मार्च २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. या महोत्सवामध्ये पर्यावरण तज्ञांचे मार्गदर्शन, लाईव्ह कॅलिग्राफी, प्राचीन उद्यान कलेचे अस्तित्व या विषयावर व्याख्यान, निसर्ग कवितांचे कविसंमेलन यांसह पर्यावरण संवर्धन व जनजागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले असून या महोत्सवात शहरवासियांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

महापौर निवास, सेक्टर नं २७ संत तुकाराम उद्यान शेजारी, निगडी प्राधिकरण येथे शुक्रवार १ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमास राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तर राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.



तर खासदार सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, डॉ.अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, संग्राम थोपटे,अण्णा बनसोडे, महेश लांडगे, अश्विनी जगताप तसेच माजी नगरसदस्य, नगरसदस्या उपस्थित राहणार आहेत. तर सकाळी ११ वाजता प्रसिद्ध शिल्पकार भगवान रामपुरे यांचे 'उद्यान शिल्पकला' या विषयावरील प्रात्यक्षिकांचे आणि मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत उदय रामदास यांचा 'नादब्रम्ह' हा संगीत संध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी ७ वाजता सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती असणार आहे. २ मार्च रोजी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत जगप्रसिद्ध सुलेखनकार अच्युत पालव हे 'लाईव्ह कॅलिग्राफी' सादर करणार आहेत. दुपारी १२ ते २ वाजेपर्यंत उद्यान विभागाच्या वतीने तंत्रज्ञान प्रात्याक्षिके आणि परसबाग चर्चासत्राचे आयोजन (छळसवळ) करण्यात आले आहे. तर सायंकाळी ५ वाजता 'प्राचीन उद्यान कलेचे अस्तित्व' या विषयावर प्रणव गोखले यांचे व्याख्यान संपन्न होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता बायोस्फिअर्स संस्थेचे पर्यावरण शास्त्रज्ञ आणि संस्थापक अध्यक्ष सचिन पुणेकर उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. संध्याकाळी ६.३० ते ९ वाजेपर्यंत सुप्रसिद्ध गायक अभिजीत कोसंबी व त्यांच्या सहकाऱ्यांचा 'धुंदी फुलांना – धुंदी कळ्यांना' हा भव्य गीतांचा कार्यक्रम सादर होणार आहे. ३ मार्च रोजी सकाळी ११ वाजता 'निसर्ग कविता' या विषयावर कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. तर दुपारी ४ ते ५ वाजेपर्यंत रविंद्र भिडे यांचे 'लागवडीनंतर गुलाबाची काळजी कशी घ्यावी' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. सायंकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत स्पर्धेमधील विजेत्या व सहभागी स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. त्यानंतर संध्याकाळी ७ ते ९ या वेळेत पर्यावरण संवर्धन व जनजागृतीसाठी महाफॅशन फाऊंडेशन प्रस्तुत 'नेचर फॉर वॉक' या कार्यक्रमाने रानजाई महोत्सवाची सांगता होणार आहे.

# मातृभाषा हे संवादाचे उत्कृष्ट माध्यम : प्राचार्या डॉ. बिंदू सैनी

## एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मध्ये मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा



**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** जागतिकीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे व्यवहारिक व ज्ञानभाषा म्हणून इतर भाषा वापरल्या जातात. परंतु कौशल्य आत्मसात करण्यासाठी, एखादी नव संकल्पना समजून घेणे किंव्हा प्रभावीपणे सादर करण्यासाठी आपली मातृभाषा हेच संवादाचे उत्कृष्ट माध्यम आहे असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. बिंदू सैनी यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलमध्ये मंगळवारी मराठी राजभाषा दिन निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात डॉ. सैनी बोलत होत्या. इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत विविध गुणदर्शन कार्यक्रम सादर केले. यामधे महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे नाटक सादर केले. गायन, नृत्य, पारंपरिक लोकगीते देखील सादर केली. अशिता भोंडवे या विद्यार्थिनीने मराठी भाषेचे महत्त्व सांगितले. वंदना सांगळे, मंजुषा नाथे, सुनीता पाटील, योगिता देशमुख, सुचिता फूलारी आणि जयश्री काळे या शिक्षिकांनी देखील मार्गदर्शन केले. एस. बी. पाटील स्कूलच्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी मराठी राजभाषा दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

# जुनी सांगवी येथील अरविंद एज्युकेशन सोसायटीत पर्यावरण संवर्धन आणि वैज्ञानिक प्रयोग सादर करीत राष्ट्रीय विज्ञान दिन



**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** जुनी सांगवी येथील अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या लिटिल फ्लॉवर इंग्लिश मीडियम स्कुल, भारतीय विज्ञानिकेतन विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन आणि वैज्ञानिक संकल्पनेवर आधारित प्रयोग सादरीकरण करून विज्ञान दिन साजरा करण्यात आला. विज्ञान प्रयोग पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.कार्यक्रमाची सुरुवात शास्त्रज्ञ सी. व्ही रमन, डॉ. एपीजे अब्दुल कलाम, संस्थेचे संस्थापक स्व. नानासाहेब शितोळे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा आरती राव, सचिव प्रणव राव, लिटल फ्लॉवर प्री प्रायमरी व प्रायमरी इंग्लिश मीडियमच्या मुख्याध्यापिका पिंकी मणिकम, लिटल फ्लॉवर माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नीलम पवार, भारतीय विज्ञानिकेतनच्या मुख्याध्यापिका आशा घोरपडे, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या शीतल मोरे, विज्ञान शिक्षिका प्रतिभा ओक, शिल्पा पालकर, हेमाली जगदाळे, तृप्ती जगताप, अश्विनी वाघमारे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रदर्शनामध्ये पर्यावरण संवर्धन, न्यूटनच्या गतीविषयक नियमावर आधारित रॉकेट मॉडेल, नैसर्गिक आपत्ती, व्हॅक्युम क्लिनर, साधी यंत्रे, डी. एन.ए. मॉडेल, पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण बल, हायड्रॉलिक ब्रिज, इलेक्ट्रोस्कोप, इलेक्ट्रीक बेल, हरितगृह वायूंचे परिणाम, प्लॅस्टिक रिसायकलींग, होलोग्राम, पीएसएलव्ही मॉडेल, भूकंप मापक यंत्र, पवनचक्की, डोअर लॉकींग सिस्टीम, ऑड्रीनो सेन्सॉर रोबोट, वॉटर लेवल इंडिकेटर, ताऱ्यांचे जीवन चक्र, न्यूटन्स क्रॅडल, रॉकेटचे कार्य, लेटर सिक्युरिटी अलार्म, कार्बन प्युरिफायर, कॅलिडोस्कोप, सोलर ट्रॅकर यावर आधारित विविध प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर केले. विद्यार्थिनींनी काढलेल्या वैज्ञानिक रांगोळ्या हे या कार्यक्रमाचे खास आकर्षण होते. सेल्फी पॉईंटला सेल्फी काढण्याचा आनंदही लुटला. पालकांनी वैज्ञानिक प्रयोगांचे निरीक्षण केले व नवनवीन वैज्ञानिक माहिती जाणून घेऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांची प्रशंसा केली.

आरती राव यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील विज्ञानाचे महत्त्व समजावून देत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांचा सर्वांगीण विकास साधावा असे आवाहन केले.

# राज्यातील शाळांमध्ये मराठीची सक्ती

## मराठी गांभीर्याने शिकवली जात नसल्याचे निदर्शनास

**पुणे | न्यूज एक्सप्रेस मराठी।** मराठी भाषा विषयाचे मूल्यांकन गुणांकनाऐवजी श्रेणी स्वरुपात करण्याच्या सवलतीचा गैरअर्थ लावून काही ठिकाणी मराठी भाषा पुरेशा गांभीर्याने शिकवली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे राज्यातील सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठीच्या सक्तीने अध्यापन आणि अध्ययनाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे, मराठी भाषेचे अध्यापन आणि अध्ययन न करणाऱ्या शाळांबाबतचा अहवाल विभागीय उपसंचालकांनी राज्य शासनाला सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अन्यथा संबंधित शाळांवर शासनस्तरावरून कारवाई केली जाणार आहे.शालेय शिक्षण विभागाने या संदर्भातील शासन आदेश प्रसिद्ध केला आहे. राज्य शासनाने



मराठी भाषेचे सक्तीचे अध्ययन आणि अध्यापन अधिनियम २०२० केला आहे. या अधिनियमाची अंमलबजावणी १ एप्रिल २०२० पासून करण्यात येत आहे. करोना संसर्गामुळे नियमितपणे शाळा सुरू नसल्याने २०२२-२३मध्ये आठवीत, २०२३-२४मध्ये नववीत आणि २०२४-२५मध्ये दहावीत जाणाऱ्या तुकडीला एक वेळची सवलत देण्यात आली होती. त्यात मराठी विषयाची परीक्षा गुणांकनाची न ठेवता श्रेणी स्वरुपात मूल्यांकन करण्याचा निर्णय १९ एप्रिल २०२३ रोजी घेण्यात आला होता. मराठी भाषा विषयाचे मूल्यांकन श्रेणी स्वरुपात करण्याची सवलत देण्यात आली असली, तरी राज्यातील शासकीय आणि खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्ययन आणि अध्यापन सक्तीचेच आहे. मात्र, दिलेल्या सवलतीचा चुकीचा अर्थ लावून काही ठिकाणी मराठी भाषा पुरेशा गांभीर्याने शिकवली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे.या पार्श्वभूमीवर मराठी भाषेचे सक्तीने अध्ययन आणि अध्यापन करण्याबाबतच्या अधिनियमाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. शासन आदेशानुसार मराठी भाषेचे सक्तीने अध्ययन आणि अध्यापन करण्याबाबतच्या अधिनियमाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याची जबाबदारी विभागीय शिक्षण उपसंचालकांवर सोपवण्यात आली आहे. गुणांकनाऐवजी श्रेणी स्वरुपात मूल्यांकन करण्याची सवलत २०२२-२३मध्ये आठवीत, २०२३-२४मध्ये नववीत आणि २०२४-२५ मध्ये दहावीत जाणाऱ्या तुकडीला एकवेळची बाब म्हणून देण्यात आली आहे. ही सवलत देण्यात आली असली, तरी श्रेणी स्वरुपात केलेल्या मूल्यांकनाच्या नोंदी संबंधित शाळांनी ठेवून त्याबाबतचा अहवाल विभागीय उपसंचालकांना सादर करणे आवश्यक आहे. सवलतीचा गैरवापर होत असल्यास त्या संदर्भातील अहवाल विभागीय उपसंचालकांनी शासनाला सादर करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच मराठी विषय न शिकवणाऱ्या शाळांची मान्यता, ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची तरतूद अधिनियमातील कलम चारमध्ये करण्यात आली आहे. त्यामुळे मराठी भाषा विषय शिकवत नसलेल्या शाळांचा अहवाल विभागीय उपसंचालकांनी शासनाला सादर करावा, शासनस्तरावरून संबंधित शाळांवर कारवाई केली जाईल.

### विभागाने आदेश प्रसिद्ध केला

» अन्यथा संबंधित शाळांवर शासनस्तरावरून कारवाई केली जाणार आहे.शालेय शिक्षण विभागाने या संदर्भातील शासन आदेश प्रसिद्ध केला आहे. राज्य शासनाने मराठी भाषेचे सक्तीचे अध्ययन आणि अध्यापन अधिनियम २०२० केला आहे. या अधिनियमाची अंमलबजावणी १ एप्रिल २०२० पासून करण्यात येत आहे. करोना संसर्गामुळे नियमितपणे शाळा सुरू नसल्याने २०२२-२३मध्ये आठवीत, २०२३-२४मध्ये नववीत आणि २०२४-२५मध्ये दहावीत जाणाऱ्या तुकडीला एक वेळची सवलत देण्यात आली होती. त्यात मराठी विषयाची परीक्षा गुणांकनाची न ठेवता श्रेणी स्वरुपात मूल्यांकन करण्याचा निर्णय १९ एप्रिल २०२३ रोजी घेण्यात आला होता.

# ओढ्यांलगत सीमाभिंती बांधण्याचा प्रश्न मार्गी

## राज्य सरकारकडून महापालिकेला २०० कोटींचा निधी

**पुणे | न्यूज एक्सप्रेस मराठी।** पूर परिस्थिती नियंत्रणासाठी नाले आणि ओढ्यांलगत सीमाभिंती उभारण्यासाठी राज्य शासनाने २०० कोटी रुपयांचा विशेष निधी महापालिकेला उपलब्ध करून दिला आहे. यासंदर्भात शासन निर्णयही राज्य शासनाने जाहीर केला असून निधीच्या उपलब्धतेमुळे रखडलेल्या सीमाभिंतींचा प्रश्न मार्गी लागणार आहे. विशेषत: आंबिल ओढ्या लगतच्या परिसराला याचा मोठा फायदा होणार आहे. पाच वर्षापूर्वी आंबिल ओढ्याला आलेल्या महापूराने शहराच्या दक्षिण भागाची वाताहात केली होती. त्यावेळी पूरामध्ये ओढ्यालगतच्या अनेक सोसायट्यांच्या सीमाभिंती कोसळल्या होत्या. या सीमाभिंती खासगी जागेत असल्याने त्या बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यास महापालिकेने नकार दिला होता. मात्र तेव्हापासून सीमाभिंतींचा प्रश्न ऐरणीवर



आला होता. महापालिकेने स्वखर्चाने सीमाभिंती बांधाव्यात, अशी मागणी करण्यात येत होती. सीमाभिंती उभारण्यासाठी राज्य शासनाकडे निधी मागण्याचा प्रस्तावावरही चर्चा झाली होती.माजी महापौर, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ यांनी त्यासंदर्भात पाठपुरावा सुरू केला होता. त्यानुसार राज्य शासनाने २०० कोटीं रुपयांचा निधी विशेष बाब म्हणून सीमाभिंती उभारण्यास दिला आहे. त्यासंदर्भातील शासन निर्णयही प्रसिद्ध करण्यात आला आहे.'महापालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद' या अंतर्गत २०० कोटी रुपये महापालिकेला मंजूर करण्यात आले आहेत. या निधीमुळे शहरातील नाल्यांच्या कडेने संरक्षण किंवा सीमाभिंती उभारल्या जाणार आहे. सीमाभिंतीमुळे पूर परिस्थितीही पाणी प्रवाही राहण्यास मदत होईल, असे मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले. दरम्यान, महापालिकाल विशेष बाब म्हणून हा निधी मंजूर झाल्याने खासगी जागेतील सीमाभिंतींची कामेही करण्यात येणार आहे. तसेच शासकीय जागांवरील सीमाभिंतीची कामेही करता येणार आहेत. निधी मंजूर झाला असला तरी अद्यापही तो महापालिकेच्या ताब्यात आलेला नाही. येत्या काही दिवसात निधी उपलब्ध झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने सीमाभिंतीची कामे केली जातील. आगामी पावसाळ्याच्या तोंडावर प्राधान्यक्रमाने सीमाभिंतीची कामे केली जातील.

# माजी खासदार राणेंचे हॉटेल पालिकेकडून लाखबंद

## ३ कोटी ७७ लाखांचा मिळकतकर थकीत

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे चिरंजीव आणि माजी खासदार नीलेश राणे यांनीच तब्बल ३ कोटी ७७ लाख ५३ हजार रुपयांचा मालमत्ता कर थकविल्याचे उघडकीस आले आहे. महापालिकेने राणे यांच्या मालकीच्या 'आर डेक्कन' या बहुउद्देशीय व्यापारी संकुलातील हॉटेल लाखबंद केले. राणे यांच्यावर महापालिकेने केलेल्या या कारवाईने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून थकबाकी वसुलीसाठी मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्यानुसार थकबाकीदारांच्या निवासस्थान आणि मिळकतींपुढे बॅण्ड वाजविण्यात येत आहे. डेक्कन येथे राणेंच्या मालकीच्या बहुउद्देशीय व्यापारी संकुलाची पाच कोटी ६० लाख रुपये थकबाकी होती, त्यापैकी १ कोटी ४० लाख रुपये एका मजल्याची थकबाकी भरण्यात आली. उर्वरित दोन मजल्यांची तीन कोटी ७७ लाख रुपये थकबाकी भरावी, यासाठी प्रशासनाकडून वारंवार पाठपुरावा करण्यात येत होता. मात्र, राणे यांच्याकडून थकबाकी भरण्यास टाळाटाळ करण्यात येत होती. त्यामुळे या इमारतीतील हॉटेल लाखबंद करण्यात आले.




शहरात अनेकांनी मालमत्ता कर थकवला आहे. त्यामुळे महापालिकेकडून मालमत्ता कराच्या वसुलीसाठी संबंधित मालमत्ता लाखबंद करण्यात येत आहेत. त्यासाठी पाच पथके नेमण्यात आली आहेत. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत बँड वाजवून थकबाकी वसूल करण्यावर भर देण्यात येत आहे. राणे यांच्या मालमत्तेचा कोट्यवधींचा मालमत्ता कर थकीत असल्याने महापालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागाने कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार राणे यांच्या हॉटेलवर कारवाई झाली आहे.शहरात दिवसभरात १६ मिळकती लाखबंद करून सुमारे आठ कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात आला आहे. 'आर-डेक्कन' या बहुउद्देशीय व्यापारी संकुलातील हॉटेलची तीन कोटी ७७ लाख रुपयांची थकबाकी आहे. त्यामुळे संबंधित हॉटेल सीलबंद करण्यात आले. असे कर आकारणी व करसंकलन विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी सांगितले.केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे चिरंजीव आणि माजी खासदार नीलेश राणे यांनीच तब्बल ३ कोटी ७७ लाख ५३ हजार रुपयांचा मालमत्ता कर थकविल्याचे उघडकीस आले आहे. महापालिकेने राणे यांच्या मालकीच्या 'आर डेक्कन' या बहुउद्देशीय व्यापारी संकुलातील हॉटेल लाखबंद केले.

### थकबाकी भरण्यास टाळाटाळ

**» महापालिकेने राणे यांच्या मालकीच्या 'आर डेक्कन' या बहुउद्देशीय व्यापारी संकुलातील हॉटेल लाखबंद केले. राणे यांच्यावर महापालिकेने केलेल्या या कारवाईने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून थकबाकी वसुलीसाठी मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्यानुसार थकबाकीदारांच्या निवासस्थान आणि मिळकतींपुढे बॅण्ड वाजविण्यात येत आहे. डेक्कन येथे राणेंच्या मालकीच्या बहुउद्देशीय व्यापारी संकुलाची पाच कोटी ६० लाख रुपये थकबाकी होती, त्यापैकी १ कोटी ४० लाख रुपये एका मजल्याची थकबाकी भरण्यात आली. उर्वरित दोन मजल्यांची तीन कोटी ७७ लाख रुपये थकबाकी भरावी, यासाठी प्रशासनाकडून वारंवार पाठपुरावा करण्यात येत होता. मात्र, राणे यांच्याकडून थकबाकी भरण्यास टाळाटाळ करण्यात येत होती. त्यामुळे या इमारतीतील हॉटेल लाखबंद करण्यात आले.**

# पुण्यासह इतर महानगरांसाठी धोक्याची घंटा!

## केंद्रीय राज्यमंत्री चंद्रशेखर यांचा इशारा

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पुण्यासह बंगळुरू, गुरूग्राम, मुंबई, दिल्ली आणि चेन्नई या महानगरांमध्ये वाहतूक कोंडी वाढत आहे. यामुळे वाहतुकीस लागणारा वेळही वाढत आहे. याचा परिणाम भविष्यात या महानगरांतील उद्योगांवर होणार आहे. यातून मार्ग काढण्यासाठी राज्य सरकारे आणि स्थानिक प्रशासनाने प्रयत्न करायला हवेत. अन्यथा छोट्या शहरांकडे गुंतवणूक वळू लागेल आणि ही महानगरांसाठी धोक्याची घंटा ठरेल, असा इशारा केंद्रीय माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी बुधवारी दिला.विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त आयोजित कार्यक्रमात चंद्रशेखर बोलत होते. ते म्हणाले की, देशांतील अनेक महानगरांमध्ये वाहतूक कोंडीची समस्या आहे. पुण्यासह बंगळुरू, दिल्ली, मुंबई, गुरूग्राम आणि चेन्नई या शहरांमध्ये ही समस्या बिकट बनली आहे. यातून मार्ग काढण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्योगांना छोट्या शहरांकडे वळा,



असा संदेश दिला होता. त्यातूनचही छोट्या शहरांमध्ये गुंतवणूक वाढविण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे. मागील काही काळात सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क उभारण्यासाठी छोट्या शहरांना सरकारने पसंती दिली.करोना संकटानंतर घरून काम करण्याची संस्कृती निर्माण झाली आहे. याचबरोबर दळणवळण यंत्रणाही सुधारली आहे. तसेच, छोट्या शहरांतून गुणवत्ता मोठ्या प्रमाणात पुढे येत आहे. यामुळे छोट्या शहरांना डिजिटल व्यवस्थेच्या माध्यमातून संधी उपलब्ध होऊ लागल्या आहेत. अनेक नावीन्यपूर्ण संशोधने छोट्या शहरांतून येत आहेत. त्यामुळे पुण्यासह इतर महानगरांसाठी ही धोक्याची घंटा आहे. या महानगरांतील वाहतूक स्थिती सुधारण्यासाठी राज्य सरकारे आणि स्थानिक प्रशासनाने प्रयत्न करायला हवेत, असेही चंद्रशेखर यांनी नमूद केले.आगामी काळात महानगरांतील वाहतूक स्थिती न सुधारल्यास गुंतवणूक छोट्या शहरांकडे वळेल. यासाठी शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासोबत नागरिकांना प्रवास सहजपणे करता येईल यासाठी प्रयत्न करायला हवेत.